# Report of NSS Special Camp

**Dr. S. D. Agalave**

# 2022-2023



**The Report of NSS Special Camp of Jawahar Arts, Science & Commerce College, Anadur, Dist-Osmanabad was held at Village Fulwadi of Taluka Tuljapur during January 17, 2023 to January 23, 2023.**

**Jawahar Arts, Science & Commerce College,**

**Anadur, Taluka-Tuljapur, Dist-Osmanabad.**

**02471-246037**

**9921326637**


GPS Map Camera
Fulwadi, Maharashtra, India
Shop No 01 Main Road Fhulwaddi, Fulwadi, Maharashtra 413603, India
Lat 17.804624°
Long 76.204122°
23/01/23 04:04 PM GMT +05:30






जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना




जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य








लोकमत

तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिरादरम्यान आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात उपस्थितांकडून बालविवाह प्रतिबंधाबाबत सामुहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

Hello Osmanabad
Page No. 4 Jan 24, 2023
Powered by: erelego.com


















NSS CAMP

दुरितांचे तिमिर जावो!

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना

## सन २०२२–२०२३

# वार्षिक विशेष शिबिर अहवाल

प्रा. डॉ. सुर्यकांत आगलावे
कार्यक्रमाधिकारी

प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना
कार्यक्रमाधिकारी

डॉ.उमाकांत चनशेट्टी
प्राचार्य
जवाहर महाविद्यालय, अणदूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद .

## जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर

ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद 413603

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक विशेष शिबिर सन 2022-23

# अहवाल

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वार्षिक विशेष शिबिर मौजे फुलवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद येथे दि. 17/01/2023 ते 23/01/2023 दरम्यान पार पडले. शिबिरात विद्यापीठाच्या 100 विद्यार्थ्यांच्या मंजुरी नुसार 53 मुले, 47 मुली, 4 प्राध्यापक व 1 शिपाई इत्यादी सहभागी होते. शिबिराचा विषय " **युवकाचा ध्यास ग्राम-शहर विकास** " असा होता. शिबिरात खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

पहिला दिवस : मंगळवार दि. 17/01/2023 रोजी शिबिराच्या पहिल्या दिवशी जवाहर महाविद्यालय, अणदूर राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी व सहयोगी प्राध्यापक दुपारी 12.00 वाजता ट्रकमध्ये बसून, सर्व साहित्य घेऊन मोजे फुलवाडी कडे निघालो.



फुलवाडी येथे आल्यावर ग्रामस्थांची बैठक घेऊन उद्घाटनाचा कार्यक्रम घेण्याबद्दल चर्चा झाली. काही विद्यार्थ्यांनी स्टेज जवळील परिसर

स्वच्छ केला, काही विद्यार्थ्यांनी स्टेजची व्यवस्था केली, काही विद्यार्थ्यांनी शाळेजवळील परिसर स्वच्छ केला व काहींनी स्वयंपाकाची तयारी केली. सायंकाळी 6.00 वाजता शिबिराचे उद्घाटन गावच्या सरपंच माननीय सौ. छाया चंद्रकांत लोहार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जवाहर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष माननीय श्री. रामचंद्र (दादा) आलुरे हे होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. गावकऱ्यांच्या वतीने प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप मा. श्री. रामचंद्र (दादा) आलुरे यांनी केला. सूत्रसंचलन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी मानले. वंदे मातरम गीता नंतर कार्यक्रम संपन्न झाला.











# जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास फुलवाडी येथे प्रारंभ



**राष्ट्रीय सेवा योजना नेमकी काय आहे.**

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) ही भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाची एक केंद्रीय क्षेत्र योजना आहे, जी 24 सप्टेंबर 1969 रोजी औपचारिकपणे सुरू करण्यात आली. हे इयत्ता अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना आणि शाळेतील विद्यार्थी तरुणांना संधी प्रदान करते. महाविद्यालये आणि विद्यापीठ स्तरावर, भारतातील तांत्रिक संस्था, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध सरकारी समुदाय सेवा उपक्रम आणि कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी. सक्रिय सदस्य असल्याने, या विद्यार्थी स्वयंसेवकांना एक कार्यक्षम सामाजिक नेता, कार्यक्षम प्रशासक आणि मानवी स्वभाव समजून घेणारी व्यक्ती बनण्याचा अनुभव आणि अनुभव मिळेल.

---

पुरोगामी विचाराचे
**एकमत**
page- 3
21 Jan 2023

# फुलवाडीत जवाहर महाविद्यालयाच्या शिबिरास प्रारंभ

**अणदूर : प्रतिनिधी**

अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विशेष शिबिराचा प्रारंभ फुलवाडी येथे झाला. शिबिराचे उद्घाटन फ ुलवाडीचे सरपंच छाया लोहार यांच्या हस्ते झाले.

अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे अध्यक्षस्थानी होते. मारुती खोबरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, माजी सरपंच नागनाथ हांडगे, उपसरपंच मधुमती धबाले, गुरुराज हांडगे, श्रीकृष्ण गायकवाड, नागरबाई हिप्परगे, ग्रामसेविका पी. के. देशमाने, पोलीस पाटील रेखा हांडगे, मुख्याध्यापक, डी. जी. शिदोरे, डॉ. सुर्यकांत आगलावे, डॉ. अनिता मुदकन्ना यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप रामचंद्र आलुरे यांनी केला. प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. चनशेट्टी यांनी केले.



या उद्घाटन समारंभास गावातील प्रतिष्ठित नागरिक प्रा. डॉ. राजशेखर वरशेट्टी, प्रा. डॉ. सुनील रजपूत, प्रा. दयानंद कांबळे, नामदेव काळे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार प्रा. डॉ. सुर्यकांत आगलावे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**पुढारी**

# जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास फुलवाडी येथे प्रारंभ

**अणदूर, पुढारी वृत्तसेवा :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या संयुक्त विद्यमाने युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास विशेष शिबीर मौजे फुलवाडी (ता.तुळजापूर) येथे मंगळवारी (दि.१७) प्रारंभ झाला.



अणदूर : शिबिराचे उद्घाटन करताना मान्यवर.

शिबिराचे उद्घाटन फुलवाडीचे सरपंच छाया लोहार यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अणदूरचे सरपंच तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे हे होते तर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मारुती खोबरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, माजी सरपंच नागनाथ हांडगे, उपसरपंच मधुमती धबाले, सदस्य गुरुराज हांडगे, श्रीकृष्ण गायकवाड ,नागरबाई हिप्परगे ग्रामसेविका पी. के.देशमाने,पोलिस पाटील रेखा हांडगे, मुख्याध्यापक. डी.जी.शिदोरे कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे डॉ.अनिता मुदकना यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपकरतानारामचंद्र आलुरेम्हणाले की, बालविवाह, अंधश्रद्धेवर विजय मिळवू या व्यसनाधीनता समाजाला लागलेलं कीड आहे.व्यसनमुक्त होऊन आरोग्य संपन्न होऊ या, वृक्षारोपण करून पर्यावरण संतुलन करू, झाड आपल्याला ऑक्सिजन देतात, निसर्ग हा आपला सोबती आहे. झाडांबरोबर राहू या. ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन करून गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन शिबीर यशस्वी करू या असे आवाहन केले. या समारंभास गावातील प्रतिष्ठित नागरिक,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. डॉ. राजशेखर वरशेट्टी, प्रा.डॉ.सुनील राजपूत, प्रा. दयानंद कांबळे,नामदेव काळे यांचे सहकार्य लाभले सूत्रसंचालन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार आभार प्रा. डॉ. आगलावे यांनी मानले.

My Latur Edition
Jan 21, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

---

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
**तरुण भारत**
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
20 Jan 2023 - Page 10



# फुलवाडीत रासेयो शिबीर सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि, १९ जानेवारी -**

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगरच्या संयुक्त विद्यमाने' युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास' या थीमवर विशेष शिबिराचे फुलवाडी येथे आयोजन केले आहे.

शिबिराचे उद्घाटन फ ुलवाडीचे सरपंच छाया लोहार यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे हे होते. तर या वेळी सदस्य मारुती खोबरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, माजी सरपंच नागनाथ हांडगे उपसरपंच मधुमती धबाले, सदस्य गुरुराज हांडगे, श्रीकृष्ण गायकवाड, नागरबाई हिप्परगे ग्रामसेविका पि. के. देशम ाने पोलीस पाटील, रेखा हांडगे, मुख्याध्यापक,.डी. जी. शिदोरे कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे डॉ.अनिता मुदकण्णा यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. यावेळी प्रा.

# फुलवाडी येथे जवाहरच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने फुलवाडी येथे आयोजित रासेयो शिबिराचे उद्घाटन सरपंच छाया लोहार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे, मारुती खोबरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, नागनाथ हांडगे, मधुमती धबाले, सदस्य गुरुराज हांडगे, श्रीकृष्ण गायकवाड, नागरबाई हिप्परगे, ग्रामसेविका पी. के. देशमाने, रेखा हांडगे, मुख्याध्यापक डी. जी. शिदोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे डॉ. अनिता मुदकन्न यांची प्रमुख उपस्थिती होती.

दुसरा दिवस : बुधवार दि. 18/01/2023 रोजी शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून प्रात:विधी झाल्यानंतर ठीक 7.00 ते 8.30 या वेळेमध्ये विद्यार्थ्यांनी प्राणायाम योगासने केली व प्रार्थना गायल्या.



अल्पोपहारानंतर 9.00 वाजता श्रमदानामध्ये विद्यार्थ्यांनी प्राथमिक शाळा फुलवाडी येथील परिसरातील झाडांना आळी करून पाणी घातले व परिसर स्वच्छ केला.







भोजनानंतर दुपारी 3.00 वाजता " **पर्यावरण संवर्धन** " या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक मा. श्री. महादेवप्पा नरे गुरुजी हे होते. तर अध्यक्ष म्हणून रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. धनंजय गटलेवार हे होते. नरे गुरुजी यांनी पर्यावरण म्हणजे काय ते सांगून, पर्यावरण संवर्धन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका फौजिया टीनवाले हिने केले व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. सूर्यकांत आगलावे यांनी मानले.







सायंकाळी 6.00 वाजता " **व्यसनाधीनता : चिंता-चिंतन** " या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. नागनाथ कुंभार हे आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पत्रकार शिवशंकर

तिरगुळे हे होते. डॉ. नागनाथ कुंभार यांनी विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना व्यसनाचे प्रकार, कारणे, दुष्परिणाम व उपाय सांगून व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप करताना शिवशंकर तिरगुळे यांनी विद्यार्थ्यांना लागलेले मोबाईल चे व्यसन फार घातक आहे, असे सांगून त्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले. शेवटी प्रा. दयानंद कांबळे यांनी आभार मानले.










तिसरा दिवस : गुरुवार दिनांक 19/01/2023 रोजी शिबिराच्या तिसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. त्यांना प्राणायाम योगासनाचे धडे प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे व प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी दिले. प्राणायाम व योगासनानंतर विद्यार्थ्यांनी आपली ओळख सांगितली व प्रत्येकाने एक सुविचार पुढे येऊन सांगितला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना समोर येऊन बोलण्याचे धाडस निर्माण झाले.






अल्पोपहारानंतर विद्यार्थ्यांनी फुलवाडी गावातील सर्व रस्ते झाडून स्वच्छ केले. कचरा जाळून टाकला व गावातील स्वच्छता केली. काही ठिकाणी तुंबलेल्या गटारी मोकळ्या करून पाणी वाहते केले.











भोजनानंतर 3.00 वाजता " **व्यक्तिमत्व विकास** " या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय कुलकर्णी हे आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एन. एस. सोमगोंडे हे होते. प्रा. कुलकर्णी यांनी शिबिरार्थी विद्यार्थ्यांना व शाळेच्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रा. सोमगोंडे यांनी केला. कार्यक्रमाचे आयोजन सर्व स्वयंसेवकांनी केले.



सायंकाळी 5 वाजता श्री श्री रविशंकर गुरुजी यांचे शिष्य ब्रह्मचारी ज्ञानेश्वर स्वामीजी हे दि. 2/02/2023 रोजी तुळजापूर येथे श्री श्री रविशंकर गुरुजींच्या मार्गदर्शनाच्या कार्यक्रमाची माहिती फुलवाडी येथील लोकांना सांगण्यासाठी जागर भक्तीचा हा कार्यक्रम घेऊन आले होते. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगून, दररोज योग करावा असे सांगितले व दोन तारखेच्या कार्यक्रमाला येण्याचे आवाहन केले.





सायंकाळी 6.00 वाजता “ **सेंद्रिय शेती व स्वयंरोजगार** ” या विषयावर बोलण्यासाठी ड्रीम फाउंडेशन, सोलापूर चे संस्थापक प्रा. काशिनाथ भतगुणकी हे आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हिंदी विभागाचे प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार हे होते. भतगुणकी सरांनी सेंद्रिय शेती म्हणजे काय ते सांगून, सेंद्रिय शेतीचे महत्व सांगितले. तसेच स्वयंरोजगार करण्यासाठी युवकांनी पुढे यावे अशे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी केले. अध्यक्षीय समारोप व आभार

प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले.







## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी माता आणि मातृभूमिची सेवा करावी:. काशिनाथ भतगुणकी

**फुलवाडी दि.21: वृत्तसेवा/ माता व मातृभूमी या स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. त्यांची सेवा करा वृद्धाश्रमात पाठवू नका,**

.आणदूर
माता व मातृभूमी या स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. त्यांची सेवा करा वृद्धाश्रमात पाठवू नका, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यांना मदत करा तुम्ही स्वतः सशक्त बना, व्यसनापासून दूर राहा सेंद्रिय शेती काळाची गरज आहे. शेतीपूरक उद्योग व्यवसायात तरुणांनी भाग घेऊन श्रम करा कष्टाला, श्रमाला पर्याय नाही. नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारा व्हा असे आव्हान केले. फुलवाडी ग्रामपंचायत सदस्य गुरुराज हांडगे यांना ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशिनाथ यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ग्रामगीता हे ग्रंथ भेट दिली व ग्राम स्वच्छता करण्याचे आवाहन केले. जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वार्षिक शिबिर मौजे फुलवाडी तालुका तुळजापूर येथे संपन्न होत आहे. तिसऱ्या दिवसाच्या सत्रात बोलताना ड्रीम फाउंडेशन सोलापूरचे अध्यक्ष सेंद्रिय शेती व स्वयंरोजगार या विषयावर शिबिर आर्थि ना मार्गदर्शन केले.अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, प्रा.डॉ.एस.एस.बाड, प्रा. डॉ.सुनील रजपूत, सदन शेतकरी शांतिर धबाले, माणिक लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन फौजीया टिनवाले व आभार प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी मानले.



चौथा दिवस : शुक्रवार दि. 20/01/2023 रोजी शिबिराच्या चौथ्या दिवशी सकाळी उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम, योगासने केली व काही एन. एस. एस. गीते व प्रार्थना गायल्या. अल्पोपहारानंतर श्रमदानामध्ये विद्यार्थ्यांनी फुलवाडी तांडा येथील प्राथमिक शाळेच्या आवारातील झाडांना आळे करून पाणी घातले. शाळेचा परिसर स्वच्छ केला.






शाळा फुलवाडीतांडा











भोजनानंतर दुपारी 4.00 वाजता " **गर्दीत माणसाच्या माणूस शोधतो मी** " या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी नळदुर्ग कॉलेजचे इतिहास विभागाचे प्रा. डॉ. संतोष पवार हे आले होते व " **बालविवाह प्रतिबंध** " या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी डी. सी. पी. यु. उस्मानाबादच्या सामाजिक कार्यकर्त्या मा. प्रज्ञा बनसोडे या आल्या होत्या. या दोन्ही कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमतचे पत्रकार माननीय श्री. दयानंद काळुंखे हे होते. प्रा. संतोष पवार यांनी माणसातील माणुसकी कमी होत चालली असून, माणसा माणसात प्रेम वाढले पाहिजे असे सांगितले व आलुरे गुरुजी सारखी माणसे शोधून त्यांचे अनुकरण आपण केले पाहिजे असे सांगितले. मा. प्रज्ञा बनसोडे यांनी बालविवाह म्हणजे काय, विवाहाचे योग्य वय काय असते. बालविवाह होत असल्यास त्याला जबाबदार कोण, त्याला काय शिक्षा होऊ शकते व त्याची माहिती कोणाला द्यावयाची याची सविस्तर अशी माहिती दिली व बालविवाह कायदा काय आहे याचे मार्गदर्शन केले. शेवटी बालविवाह प्रतिबंधाची शपथ सर्व उपस्थितांना दिली. अध्यक्षीय समारोपामध्ये दयानंद काळुंखे यांनी बालविवाह प्रतिबंधाच्या कार्यावर गीत सादर केले व बालविवाह न करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. शेवटी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना यांनी उपस्थितांचे आभार मानले व एकल महिलांना हळदी कुंकाचा मान देऊन, तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमासाठी फुलवाडी येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन, पाहुण्याची ओळख, प्रस्ताविक विद्यार्थ्यांनी केले. चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.










लोकमत

# बालविवाह प्रतिबंधासाठी सर्वांच्या पुढाकाराची गरज : प्रज्ञा बनसोडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** लहान वयात मुलांचे लग्न झाल्याने त्यांचे आरोग्य, मानसिकता व विकासावर परिणाम होतो. प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने बालविवाह प्रतिबंधासाठी पुढाकार घेऊन याबाबत जाणीव जागृती करणे गरजेचे आहे, असे मत जिल्हा बालसंरक्षण विभागाच्या सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा बनसोडे यांनी व्यक्त केले.

तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथे जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने आयोजित रासेयो शिबिरात 'बालविवाह प्रतिबंधक ही काळाची गरज' या विषयावर त्यांचे मार्गदर्शन झाले. अध्यक्षस्थानी उपसरपंच मधुमती धबाले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. संतोष पवार, जिल्हा महिला बालविकास कार्यालयाच्या समुपदेशक शारदा गंडले, माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. एस. आर. भारती, पोलिस पाटील रेखाताई हांडगे, आशा कार्यकर्ती शकुंतला लंगडे, मुख्याध्यापक धुळाप्पा शिदोरे, अंगणवाडी सेविका मंगल जेटे, सुजाता हांडगे, सहशिक्षिका सुनीता ढेपे, मीना बनसोडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. संतोष पवार, शारदा गंडले, डॉ. अनिता मुदकन्ना यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बालविवाह प्रतिबंधासाठी सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली. सूत्रसंचालन फौजीया टिनवाले, प्रास्ताविक देवकी मोळगडे यांनी केले. आभार शिल्पा राठोड यांनी मानले. यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे, माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. सुनील राजपूत, डॉ. मल्लीनाथ बिराजदार, डॉ. मानसी स्वामी, डॉ. दीपा कलशेट्टी, डॉ. ज्योती हत्तरगे, डॉ. एम. एन. गडसिंग आदींनी पुढाकार घेतला.

Hello Osmanabad
Page No. 4 Jan 24, 2023
Powered by: erelego.com

लोकमत



तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिरादरम्यान आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात उपस्थितांकडून बालविवाह प्रतिबंधाबाबत सामुहिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

Hello Osmanabad
Page No. 4 Jan 24, 2023
Powered by: erelego.com

पाचवा दिवस : शनिवार दिनांक 21/01/2023 रोजी शिबिराच्या पाचव्या दिवशी सकाळी उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली, कांही प्रार्थना गायल्या व प्रत्येकाने सुविचार सांगून आपली ओळख करून दिली.





नंतर विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी करण्यासाठीचे ॲप डाऊनलोड करून घेण्यास सांगितले व **मतदार नोंदणी** कशी करायची याची माहिती प्राथमिक शाळा फुलवाडीच्या शिक्षिका बनसोडे मॅडम यांनी दिली. प्रत्येकाने प्रथम आपली नोंदणी करून घ्यावी व इतर फुलवाडी येथील युवकांची मतदार नोंदणी करून घ्यावी असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. प्रा. डॉ. सुनील रजपूत व प्रा. डॉ. राजशेखर वरशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी कशी करायची याचे मार्गदर्शन केले. त्यानुसार विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करून घेतली.








सायंकाळी 5.00 वाजता “ **संभाषण**

**कौशल्य** ” या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी प्रयाग मल्टीस्टेट नांदगाव चे संचालक माननीय श्री. दत्तात्रय बनजगोळे हे आले होते, तसेच शेतकऱ्यांना शेतकरी मेळाव्यात “ **माती परीक्षण, खत नियोजन व पोखरा योजनेची माहिती** ” देण्यासाठी लोहारा चे कृषी पर्यवेक्षक मा. श्री. रवी बाबुराव बनजगोळे व नळदुर्गचे कृषी पर्यवेक्षक मा. श्री. धन्यकुमार बिराजदार हे आले होते. या दोन्ही कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून फुलवाडीचे सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. बळीराम जेठे हे होते. प्रथम दत्तात्रय बनजगोळे यांनी विद्यार्थ्यांना संभाषण कौशल्य या विषयावर मार्गदर्शन केले. शेतकरी जमा झाल्यावर शेतकऱ्यांना रवी बनजगोळे व धन्यकुमार बिराजदार यांनी माती परीक्षण करून घ्यावे व त्यानुसार रासायनिक खताचा वापर करावा तसेच त्यानुसारच पीके घ्यावीत या संदर्भात मार्गदर्शन केले. शेवटी पोखरा योजनेची माहिती सांगून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा कार्यक्रम झाला. अध्यक्षीय समारोप श्री. बळीराम जेठे यांनी केला. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. सूर्यकांत आगलावे यांनी केले व आभार प्रा. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले. चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



सहावा दिवस : रविवार दि. 22/01/2023 रोजी शिबिराच्या सहाव्या दिवशी सकाळी लवकर उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली व एन. एस. एस. गीते गायली. अल्पोपहारानंतर सर्व रोग निदान शिबिराची तयारी केली. त्यासाठी फुलवाडी ग्रामपंचायत च्या दोन्ही रूममध्ये टेबल खुर्च्या मांडून, समोरचा बोर्ड लिहून व बॅनर लावून सकाळी ठीक 10.00 वाजता “ **सर्व रोग निदान** ” शिबिराचे उद्घाटन फुलवाडीचे माजी



सरपंच मा. श्री. नागनाथ हांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. हॅलो मेडिकल फाउंडेशन संचलित जानकी रुग्णालय, अणदूर व जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सर्व रोग निदान शिबिर घेण्यात आले. तपासणीसाठी आलेल्या सर्व रुग्णांना औषध गोळ्याही देण्यात आल्या व त्याची तपासणी केली. डॉ. सुनिता चकरवार,



कविता राठोड, लक्ष्मी दुपारगुडे, गुलाब जाधव, श्रीकांत अणदुरकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. अनिता मुद्दकन्ना, आशा कार्यकर्त्या शकुंतला लंगडे, ग्रामपंचायत सदस्य गुरुराज हांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत एकूण 70 रुग्णांची तपासणी झाली. 60 जणांची शुगर तपासणी केली व सर्वांची हिमोग्लोबिनची तपासणी करून औषध गोळ्या देण्यात आल्या. शिबिरातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचेही हिमोग्लोबिन तपासून घेतले व त्यांना डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. या सर्व रोग निदान शिबिरास प्रा. दयानंद कांबळे, प्रा. महेश कांबळे, विनोद हिप्परगे, शिवानंद रिंगणे, हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या नर्सिंग चे विद्यार्थी यांचे विशेष सहकार्य लाभले.




नोटिस बोर्ड




जिल्हा परिषद
ग्रामविकास अधिकारी
ग्रामसेवक
जिल्हाधिकारी
एम.एस.ई.बी.
सरपंच
पंचायत समिती




समागृह







व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून
कामधेनु सामाजिक संस्था, फुलवाडी तर्फे
ग्रा पं. कार्यालय फुलवाडी सप्रेम भेट





अग्नीशामक
ॲम्ब्युलंस
ॲम्ब्युलंस
हॉस्पिटल
सरकारी रुग्णालय
उपजिल्हा रुग्णालय
महत्वाचे नंबर
जिल्हा परिषद
ग्रामविकास अधिकारी
ग्रामसेवक
जिल्हाधिकारी
एम.एस.इ.बी.
सरपंच
पंचायत समिती
लिंग, जात,
धर्म, आधारीत
भेदभाव केला
जात नाही.







## हॅलो मेडिकल व जवाहर महाविद्यालयाच्या वतीने सर्व रोग निदान शिबिर

**शिव निर्णय**/ अणदूर : हॅलो मेडिकल फाउंडेशन अणदूर व जवाहर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे फुलवाडी येथे रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन फुलवाडी चे माजी सरपंच नागनाथ हांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सुनिता चकरवार, कविता राठोड, लक्ष्मी दुपारगुडे, गुलाब जाधव, श्रीकांत अणदूरकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. अनिता मुदकन्ना, आशा कार्यकर्त्या शकुंतला लंगडे, ग्रामपंचायत सदस्य गुरुराज हांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व रोग निदान शिबिरात ६० जनांची शुगर तपासणी, ७० रुग्ण तपासणी व औषधोपचार करण्यात आले.

या सर्व रोग निदान शिबिरास प्रा. दयानंद कांबळे, प्रा. महेश कांबळे, विनोद हिप्परगे शिवानंद रिंगणे, हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या नर्सिंगचे विद्यार्थी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिरात शिबिरार्थी विद्यार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

भोजनानंतर दुपारी 3.00 वाजता गटचर्चा करून सायंकाळी होणाऱ्या विविध गुणदर्शनाची तयारी केली. त्यासाठी प्रा. विवेकानंद वाहूळे, प्रा. डॉ. उमाकांत सलगर, ॲड. श्री. शिरिष देशपांडे, श्री. दशरथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणदर्शनाची तयारी करून घेतली. नंतर सायंकाळी 7.00 वाजता विद्यार्थ्यांचा **विविध कला गुणदर्शनाचा** कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायतचे सदस्य गुरुराज हांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्टेजवर अनेक गीते सादर करून गावकऱ्यांच्या मनोरंजनाबरोबरच प्रबोधनही केले.










सातवा दिवस : सोमवार दि. 23/01/2023 रोजी शिबिराच्या सातव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून सर्व परिसर स्वच्छ केला. त्याचबरोबर सर्व मुताऱ्या व संडासही स्वच्छ करून घेतल्या, सर्व कचरा गोळा करून जाळून टाकला.





























नंतर योगासनाचा सराव केला. भोजनानंतर दुपारी 2.30 वाजता **शिबिराचा समारोप** करण्यात आला. समारोपाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा सरपंच ग्रामपंचायत अणदूरचे श्री. रामचंद्र (दादा) आलुरे हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून फुलवाडीचे माजी सरपंच श्री. नागनाथ (मामा) हांडगे हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये फुलवाडीच्या ग्रामसेविका सौ. देशमाने मॅडम, जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुरेश ठोंबरे, अणदूर ग्रामपंचायत सदस्य गणेश सूर्यवंशी, फुलवाडीचे श्री. चंद्रकांत लोहार, श्री. राजेंद्र धबाले, श्री. तुकाराम भोळे, श्री. सातलिंग ड बोंगरगे, श्री. सुभाष हिपरगे, ग्रामपंचायत सदस्य श्री. गुरुराज हांडगे व प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व फुलवाडीचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहवालाचे वाचन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी केले. फुलवाडी ग्रामस्थांच्या वतीने प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना व श्रीमती पि. के. देशमाने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भक्ती होगाडे, फौजीया टीनवाले, मिथुन राठोड या स्वयंसेवकांनी आपले अनुभव सांगितले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य सुरेश ठोंबरे यांनीही मार्गदर्शन केले. नंतर प्रमुख पाहुणे मा. श्री. रामचंद्र (दादा) आलुरे यांनी मार्गदर्शन करताना मन प्रसन्न ठेवून जो कार्य करतो तो यशस्वी होतो, सूर्योदयापूर्वी उठतो तो खरा तरुण असतो, आळस झटकून काम करावे, अभिमानाचे विसर्जन करून स्वाभिमानाचे जतन करावे, समाजात पुस्तकांपेक्षा माणूस वाचणे फार महत्त्वाचे आहे, वैऱ्याचा सुद्धा

सन्मान करायला शिका असे अनमोल मार्गदर्शन केले. शेवटी प्रा. दयानंद कांबळे यांनी सर्वांचे आभार मानले.















पुरोगामी विचाराचे

# एकमत

page- 6
25 Jan 2023

हळदी-कुंकू कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद । जवाहर महाविद्यालयाच्या एनएसएस शिबिराचा समारोप

## मन प्रसन्न ठेऊन जो कार्य करतो तो यशस्वी होतो : आलुरे

अणदूर : प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेतील सात दिवस हे स्वतःला बदलण्यासाठी आहेत, ही जन्माची शिदोरी आहे, उभ्या आयुष्यासाठी उपयोगी आहे. स्वतःला प्रश्न विचारा, सूर्योदया अगोदर उठणारा खरा तरुण असतो. मन प्रसन्न ठेवून जो कार्य करतो तो यशस्वी होतो आळसास मुभा न द्यावा, आळस झटका, ... स्वाभिमान जतन करा, समाजात पुस्तकापेक्षा माणूस वाचणे फार महत्वाचे आहे. वैऱ्याला सुद्धा सन्मान करायला शिका असे अनमोल मार्गदर्शन प्रमुख पाहुणे रामचंद्र आलुरे यांनी शिबीर समारोपप्रसंगी सोमवारी (दि.२३) केले. ... प्रसारक मंडळ, अणदूर संचलित, जवाहर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप समारंभ सोमवारी (दि.२३) झाला. अध्यक्षस्थानी फुलवाडीचे माजी सरपंच नागनाथ हांडगे, माजी सरपंच सुभाष ..., सातलिंग बोमले, तुळजापुरचे चंद्रकांत लोहार, ग्रामसेविका पी. के. देशमाने अणदूर ग्रामपंचायत सदस्य गणेश सूर्यवंशी, फुलवाडी ग्रामपंचायत सदस्य, गुरुराज हांडगे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, मुख्याध्यापक, प्रा. सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामसेविका पी. के. देशमाने कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिता मुदकन्ना, प्रा. सुरेश ठोंबरे प्राचार्य, डॉ. उमाकांत चनशेट्टी इत्यादींनी विचार व्यक्त केले. प्राचार्य चनशेट्टी म्हणाले की, सेवा केल्याने व्यक्तिमत्व उजळून निघते. संघ भावना व जबाबदारीचे जाणीव होते. राष्ट्र बळकटीसाठी हे आवश्यक आहे. सुप्त गुणांना वाव देण्यासाठी पुढे या. व्यक्तिमत्व विकास करा असे आवाहन केले. अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी केले. भक्ती हेगाडे, फौजीया टीनवाले, मिथुन राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. शिबिरासाठी डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. सुनील रजपूत, डॉ. मानसी स्वामी, डॉ. उमाकांत सलगर, प्रा. विवेकानंद वाहुळे, नामदेव काळे यांचे योगदान लाभले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार व आभार प्रा. दयानंद कांबळे यांनी मानले.





शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना, प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार, प्रा. डॉ. राजशेखर वरशेट्टी, प्रा. डॉ. सुनील रजपूत, प्रा. दयानंद कांबळे, प्रा. महेश कांबळे यांनी परिश्रम घेतले.






गावातील सरपंच व सर्व सदस्य तसेच फुलवाडीचे ग्रामस्थ यांनी शिबिरात उस्फुर्त सहभाग घेतला व सहकार्य केले.